केसरी पुणे, १५ जुलै २०१८/४



# हुतात्मा राजगुरु विद्यालयात वृक्षारोपण

पुणे : पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाळांगण' प्रकल्पाअंतर्गत जागतिक कृषी दिनानिमित्त पांडवनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरु विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी क्विक हील फाऊंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, हुतात्मा राजगुरु विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जाधव, मुख्याध्यापिका जयश्री पाटील व विभागप्रमुख शारदा शेटे उपस्थित होते. डोनेटेड सोसायटी व रवी फडके यांनी आंबा, जांभूळ, चिंच, करंज व काही फुल झाडे दिली. पर्यावरणाचे प्लास्टिकपासून रक्षण करण्याच्या उद्देशाने मुलांनी प्लास्टिक बाटल्यांमध्ये वेल लावून शाळा सुशोभित करण्याची सुरुवात केली. विभागप्रमुख शारदा शेटे यांनी आभार मानले.